लोकमत

epaper.lokmat.com

कोल्हापूर, शुक्रवार, दि. २७ सप्टेंबर २०२४ ५

# 'विवेकानंद'मध्ये विद्यार्थ्यांचा सत्कार

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी विभागातील सेला रेगे, चेतन पवार व सार्थक कुलकर्णी यांनी दिल्लीतील थल सैनिक शिबिर यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र बटालियनचे कर्नल मानस दीक्षित, कर्नल सुहास काळे, कर्नल संधान मिश्रा, कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

शुक्रवार, २७ सप्टेंबर २०२४

# 'एमपीएससी'त रोहित कुंभार, तन्मय मांढरे यांचे लखलख यश

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



रोहित कुंभार

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा - २०२३ मुख्य परीक्षेचा निकाल गुरुवारी रात्री जाहीर झाला. परीक्षेत कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. इचलकरंजी येथील तन्मय मांढरे यांनी १० वी तर शहरातील शाहूपुरी येथील रोहित कुंभार यांनी ४६ वी रँक मिळवली आहे.

'एमपीएससी'ने राज्य मुख्य परीक्षेची गुणवत्ता यादी गुरुवारी रात्री आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली. एकूण ३०२ पदांसाठी राज्यसेवा मुख्य परीक्षा ३ नोव्हेंबर २०२३ रोजी घेण्यात आली होती. रोहित यांचे प्राथमिक माध्यमिक शिक्षण वि. स. खांडेकर प्रशाला शाहूपुरी येथे झाले. विवेकानंद कॉलेज येथे बारावीचे शिक्षण घेतले. त्यानंतर पुणे येथील सीओईपी कॉलेजमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी संपादन केली.

## ● राज्यसेवा मुख्य परीक्षेचा निकाल जाहीर

२०२३ मध्ये झालेली महाराष्ट्र राज्य सेवा परीक्षा दिली. यात यश संपादन केले आहे. कुंभार यांचे वडील दिलीप कुंभार पोस्ट खात्यामध्ये लिपिक आहेत. गणेशमूर्ती बनवण्याचा त्यांचा व्यवसाय असून आई वैशाली हा व्यवसाय पाहतात. नियमित पुस्तकांचा अभ्यास व सेल्फ स्टडीवर भर दिला. जास्तीत जास्त सराव प्रश्नपत्रिका सोडवल्यामुळे यश संपादन झाल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यामध्ये उपजिल्हाधिकारी पद मिळवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला आहे.

परीक्षेसाठी सर्वसाधारण गुणवत्ता यादी तात्पुरता स्वरूपाची आहे. अंतिम निकालापूर्वी कागदपत्रे पडताळणी, प्रमाणपत्र पडताळणीमुळे यात बदल होऊ शकतो. दरम्यान, गुणवत्ता यादीत आलेल्या उमेदवारांना पदांचे पसंती क्रमांक ऑनलाईन सादर करण्याची सुविधा लवकरच उपलब्ध करून दिली आहे. लवकरच मुख्य परीक्षेचे अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे.

26/09/24

28/9/24